Maharashtra Times, Pune, September 30, 2013 Pp. 2

# मातृभाषेतील शिक्षण अधिक उपयुक्त

## डॉ. जयंत नारळीकर यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘आताच्या पालकांना आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमातून शिकवावे का मराठी माध्यमातून, असा प्रश्न पडतो. माझे दहावीपर्यंतचे शिक्षण हिंदी माध्यमातून झाले. मात्र, मातृभाषेतून मिळणारे शिक्षण अधिक सोप्या पद्धतीने समजते,’ असे प्रतिपादन ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी केले.

‘मृत्युंजय प्रतिष्ठान’तर्फे डॉ. नारळीकर आणि सामाजिक कार्यकर्त्या कांचन परुळेकर यांना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते ‘मृत्यंजुय पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. मृणालिनी सावंत, डॉ. सागर देशपांडे आदी या वेळी उपस्थित होते. ‘मराठी भाषेच्या भवितव्याविषयी सवाल उपस्थित केला जात असला, तरी मृत्युंजयसारखे अभिजात साहित्य असताना मराठीला मरण नाही. मात्र, नवीन लेखकांकडून रोचक साहित्यनिर्मिती झाली पाहिजे. मराठी भाषा वाचविण्यासाठी विज्ञान हा विषय मराठीतून शिकविण्याची गरज आहे,’ असे नारळीकर म्हणाले.

राहुल देशमुख



देशात अद्याप महिलांचे सबलीकरण झालेले नाही. भारत एकाच पायावर उभा असताना, आर्थिक महासत्ता कसा काय होणार असा सवाल परुळेकर यांनी केला. आजच्या मंत्र्यांची भाषणे पाहिल्यावर, विनोद मरेल असे वाटत नाही. मराठी टिकण्यासाठी गावागावांमध्ये साहित्य संमेलने व्हावीत. त्यात कोणतेही राजकारण नसावे,’ अशी अपेक्षा पुरंदरे यांनी व्यक्त केली.